# प्रेस नोट

दि. ०२/०९/२०२३

**सन २०२० पासून खून व खूनाचा प्रयत्न या गुन्हयातील पाहिजे असलेल्या आरोपीस कक्ष-७, गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतलेबाबत...**

गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष-७, घाटकोपर, मुंबई.कक्ष कार्यक्षेत्रातील घटकोपर पोलीस ठाणे हददीमध्ये दिनांक २७/०५/२०२० रोजी यातील आरोपींनी आपआपसांत संगनमत करून फिर्यादी व त्याचे मित्र यांनी आरोपीतांना गांजा व दारू विक्री करण्यास विरोध केला या कारणावरून फिर्यादी यांचा मित्र नामे सलमान यास चाकु व तलवारीने जिवे ठार मारले तसेच फिर्यादी यांना गंभिर दुखापतीस कारणीभूत झाले म्हणून घाटकोपर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३२८/२०२०, कलम ३०२, ३०७, ५०४, ५०६, ३४ भादंविस सह ४, २५ भा.ह.का.सह ३७(१) म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरचा गुन्हा घडल्यापासून सदर गुन्हयाचा समांत्तर तपास कक्ष कार्यालयाकडून सुरू होता. सदर गुन्हयातील आरोपी हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. पो.उ.नि. महेश शेलार हे तांत्रिक तपास करून आरोपीचा शोध घेत असतांना पाहिजे आरोपी हा मागिल तीन वर्षापासून त्याचे अस्तित्व लपवुन मुर्शिदाबाद-पश्चिम बंगाल, कोलकत्ता, उदयपुर-राजस्थान, पालघर, ऐरोली-नवी मुंबई, नालासोपारा याठिकाणी असल्याचे व वारंवार त्याचे राहण्याचे ठिकाणे बदलत असल्याचे दिसून आले होते. तसेच तांत्रिक तपासात पाहीजे आरोपी मागील वर्षभरापासुन साधारण ५० पेक्षा जास्त मोबाईल क्रमांक सतत बदलुन त्याचे अस्तित्व लपवत असल्याचे दिसुन आले. सदर आरोपी हा आज रोजी कल्याण येथे येणार असलेबाबतची खात्रीशिर माहिती या कक्षाचे पो.शि.क्र.०८०८७२/होनमाने व पो.शि.क्र.०९०५७२/पाटील यांना प्राप्त झाली होती. त्यानुसार कक्ष-७, गुन्हे शाखेच्या पथकासह मा.वरीष्ठांचे परवानगीने कल्याण, जि.ठाणे येथे सापळा लावण्यात आला. सदर वेळी नमुद पाहिजे आरोपी हा कल्याण येथे आला असता त्याला कोणत्याही प्रकारचा संशय येणार नाही याची खबरदारी घेवून त्याचा शिताफीने पाठलाग करून त्यास ऐरोली, नवी मुंबई येथून ताब्यात घेतले.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री.देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशी कुमार मिना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. राज तिलक रौशन, मा. पोलीस उप आयुक्त (प्रतिबंधक) श्री. अमोघ गांवकर (अति.कार्यभार), मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पूर्व) श्री.चंद्रकांत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तावडे, पो.नि. सावंत, पो.नि. उबाळे, म.पो.नि. बाळगी, पो.उ.नि. धोत्रे, पो.उ.नि. शेलार, पो.उ.नि. काळे, पो.उ.नि. परबळकर, म.स.फौ./धुमाळ, स.फौ./सावंत, पो.ह.क्र.३१३४७/पवार, पो.हवा.क्र.९६०६३३/बल्लाळ, पो.हवा.क्र.००३५१/शिरापुरी, पो.हवा.क्र.०३०८३५/जाधव, पो.हवा.क्र.०३०४६७/गलांडे, पो.ना.०६.१९४०/राऊत, पो.शि.क्र.०८०८७२/होनमाने, पो.शि.क्र.०९०५७२/पाटील, पो.शि.क्र.०९०४६४/सावंत, म.पो.शि.क्र.११२१५३/शेख, म.पो.शि.१४१२६५/जाधव यांनी केली आहे.

---